दाखल दिनांक : ०४.०९.२०१२
नोंदणी दिनांक : ०४.०९.२०१२
निकाल दिनांक : ०२.०१.२०१७
कालावधी : ४व. ३म. २८दि.

# पुणे येथील सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर पुणे यांचे न्यायालयात

(पिठासन अधिकारी : प्र. र. अष्टुरकर)

**स्पे.मु.नं.११९७/२०१२**
**नि.क्र.४७**

**सिटी कार्पोरेशन प्रा. लि., पुणे**
भारतीय कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था,
जिचा नोंदणी क्रमांक U45202 PN 2003 PLC 018435
Dated 07.08.2004
पत्ता : ९१७/१९ अे, एफ. सी. रोड, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.
तर्फे संचालक :
**श्री. अनिरुध्द प्रद्युम्न देशपांडे**
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : व्यापार,
रा. फ्लॅट नं. ३०१, १ मोदीबाग,
गणेशखिंड रोड, पुणे : ४११ ०१६.
**तर्फे अधिकृत प्रतिनिधी**
**श्री. चंद्रकांत नामदेव रावडे**
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी,
रा. १२८, नादब्रम्ह, वारजे, पुणे : ४११ ०५२. .... वादी.

**विरुध्द**

**श्री. विजय नारायणराव वनारे**
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : शेती व व्यापार,
रा. ‘‘असराई’’ कुलकर्णी बाग, कॉलेज रस्ता,
ता. नाशिक, जि. नाशिक ०५. .... प्रतिवादी.

**दावा रक्कम रु. ४१,०२,०००/— वसुलीकरिता.**

**उपस्थिती** :
वादीतर्फे अॅडव्होकेट : श्री. अे. जे. पटवर्धन
प्रतिवादी : एकतर्फा.

# न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक ०२.०१.२०१७)**

सदरचा दावा हा वादीने रक्कम रु. ४१,०२,०००/— च्या वसुलीकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या दाव्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :—

वादी ही नोंदणीकृत कंपनी असून ती बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहे. वादी कंपनीला नाशिक येथे विशेष नगर वसाहत प्रकल्प सन २००७ साली राबविण्याचा उद्‌देश होता व आहे. सदरच्या प्रकल्पाकरिता कमीत कमी १०० एकर जागेची आवश्यकता असल्याने वादी नाशिक येथे जमीनीच्या शोधात होते. प्रतिवादीला सदरची बाब कळाल्यानंतर त्यांनी वादींशी संपर्क साधला व नाशिक येथे उपरोक्त प्रकल्पाकरिता कमीत कमी ११० ते १२० एकर जमीन संपादित करुन देण्याची तयारी दर्शविली. त्या कामी त्यांनी वादी व नाशिक येथील आजूबाजूच्या उपनगरातील जमीन मालक, शेतकरी यांचेमध्यक व्यवहार घडवून आणण्यासाठी मध्यस्थी व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दिनांक १४.१२.२००७ रोजी 'समजुतीचा करारनामा' करण्यात आला व त्यापोटी प्रतिवादीला रक्कम रु. ५१,००,०००/— धनादेशाद्‌वारे देण्यात आले. त्याबाबत प्रतिवादीने वादीला पावती देखील लिहून दिली. त्यानंतर, प्रतिवादीला समजुतीच्या करारनाम्याप्रमाणे कार्य करणे शक्य न झाल्याने दिनांक १४.१२.२००७ रोजीचा 'समजुतीचा करारनामा' नोव्हेंबर २००८ मध्ये रद्‌द करण्यात आला व प्रतिवादीने रक्कम रु. ५१,००,०००/— वादी यांना परत करण्याचे कबूल केले. त्यानुसार प्रतिवादीने दिनांक २५.०२.२००९ व २५.०५.२००९ रोजीचे प्रत्येकी रक्कम रु. २५,००,०००/— व रु. २६,००,०००/— चे दोन धनादेश वादीला दिले. सदरचे दोन्हीही धनादेश न वटता परत आले. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द परक्राम्य संलेख अधिनियमानुसार खटला दाखल केला. त्यातील एका खटल्यात प्रतिवादीला शिक्षा देखील झाली. तद्‌नंतर, वादी व प्रतिवादीमध्ये परत एकदा समझोता होवून प्रतिवादीने वादीला मागणी धनविकर्षा (डिमांड ड्राफ्ट) न्वये रक्कम रु. १०,००,०००/— अदा केले व उर्वरित रक्कम रु. ४१,००,०००/— करिता प्रत्येकी

रक्कम रु. १०,००,०००/— चे दिनांक २२.०५.२०११, २२.०८.२०११ व २२.११.२०११ रोजीचे तीन धनादेश व दिनांक २२.०२.२०१२ रोजीचा रक्कम रु. ११,००,०००/— चा एक धनादेश दिला. उपरोक्त सर्व धनादेश अनादरित झाले. त्यानंतर वेळोवेळी मागणी करुनही प्रतिवादीने रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने वादीने त्याला दिनांक ०२.०३.२०१२ रोजी नोटीस पाठविली. त्यानंतरही प्रतिवादीने रक्कम न दिल्याने वादीने सदरचा दावा दाखल करुन तो प्रार्थनेनुसार मंजूर व्हावा, अशी विनंती केली.

३. प्रतिवादीला दाव्याचे समन्स प्राप्त होवूनही, तो हजर न झाल्याने, सदरचा दावा त्याचे विरुध्द 'एकतर्फा' चालविण्याचा आदेश माझे पुर्वाधिका—याने पारीत केला.

४. वादीच्या कथनावरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत व त्यावर मी माझे कारणेमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हा प्रार्थनेनुसार मागितलेल्या दादला हक्कदार आहे काय ? | ...होकारार्थी. |
| २ | आदेश व हुकूमनामा कोणता ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणेमिमांसा

५. आपल्या कथनाच्या पुष्ठयर्थ वादीने स्वत:ची व कंपनीचा अधिकृत प्रतिनिधी श्री. चंद्रकांत नामदेव रावडे याची साक्ष नोंदविली. दोन्हीही साक्षीदारांची साक्ष दावे कथनानुसारच आहे. त्यांनी आपल्या साक्षीद्वारे खालील विविध प्रकारची दस्तऐवजे सिध्द केली आहेत.

**१. दिनांक २७.०६.२०१२ रोजीचे अधिकारपत्र, मूळ प्रत, नि. क्र. १६,**

२. दिनांक ०८.०७.२००४ रोजीचे वादी कंपनीचे नोंदणीकृत प्रमाणपत्र, सर्टिफाईड प्रत, नि. क. १७,

३. दिनांक १४.१२.२००७ रोजीचा समजुतीचा करारनामा, मूळ प्रत, नि. क. ४९,

४. दिनांक १४.१२.२००७ रोजी वादी यांनी प्रतिवादी यांना लिहून दिलेली रक्कम मिळाल्याबाबतची पावती, मूळ प्रत, नि. क. १८,

५. दिनांक ०९.०६.२०१४ रोजीचे इंडियन बॅक,शाखा नाना पेठ, पुणे यांनी वादी यांना दिलेले पत्र, मूळ प्रत, नि. क.१९,

६. नोव्हेंबर २००८ रोजीचा समजुतीचा करारनामा, मूळ प्रत, नि. क. ४१,

७. दिनांक २५.०२.२००९ रोजीचा धनादेश क. १६४६०, मूळ प्रत, नि. क. २०,

८. दिनांक २५.०५.२००९ रोजीचा धनादेश क. १६४६१, मूळ प्रत, नि. क. २१,

९. दिनांक १६.०३.२००९ रोजीचा बेंक मेमो, मूळ प्रत, नि. क. २२,

१०. दिनांक १३.०४.२००९ रोजी वादी यांनी त्यांचे वकीलांमार्फत प्रतिवादीला पाठविलेली नोटीस, मूळ प्रत, नि. क. २३,

११. फौजदारी केस क. २८०१६/२००९ आदेशाची सर्टिफाईड प्रत, नि. क. २४,

१२. आर. सी. सी. नं. ५२३/२०१० ची सर्टिफाईड प्रत, नि. क. २५,

१३. फौजदारी अपिल क. १०४/२०११ या अपिल मेमोची सर्टिफाईड प्रत, नि. क. २६,

१४. दिनांक २५.०२.२०११ रोजीचा समजुतीचा करारनामा, मूळ प्रत, नि. क. ४२,

१५. दिनांक २२.०५.२०११ रोजीचा धनादेश क. ०००५५६, मूळ प्रत, नि. क. २७,

१६. दिनांक ०२.०९.२०११ रोजीचा बॅक मेमो, मूळ प्रत, नि. क. २८,

**१७. दिनांक २२.०८.२०११ रोजीचा धनादेश क. ०००५५७, मूळ प्रत, नि. क. २९,**

**१८. दिनांक २३.०८.२०११ रोजीचा बॅंक मेमो, मूळ प्रत, नि. क. ३०,**

**१९. दिनांक २२.११.२०११ रोजीचा धनादेश क. ०००५५८, मूळ प्रत, नि. क. ३१,**

**२०. दिनांक ०८.१२.२०११ रोजीचा बॅंक मेमो, मूळ प्रत, नि. क. ३२,**

**२१. दिनांक २२.०२.२०१२ रोजीचा धनादेश क. ०००५५९, मूळ प्रत, नि. क. ३३,**

**२२. दिनांक २२.०२.२०१२ रोजीचा बॅंक मेमो, मूळ प्रत, नि. क. ३४,**

**२३. दिनांक ०२.०३.२०१२ रोजीची नोटीस, कार्यालयीन प्रत, नि. क. ३५,**

**२४. नोटीस प्रतिवादी यांनी न स्विकारता परत आल्याबाबतचे पाकीट व पोहोच पावतीसह, मूळ प्रत, नि. क. ३६.**

६. उपरोक्त कागदपत्रांच्या अवलोकनावरुन व साक्षीदारांच्या साक्षीवरुन हेच दिसून येते की, प्रतिवादीने रक्कम रु. ५१,००,०००/— स्विकारले व त्यापैकी दिनांक २५.०२.२०११ च्या करारानुसार रक्कम रु. १०,००,०००/— परत देवून रक्कम रु. ४१,००,०००/— करिता चार वेगवेगळे धनादेश दिले. त्यापैकी एकही धनादेश वटला नाही. अर्थातच, दिनांक २५.०२.२०११ रोजीचा करारनामा झालेवर मुदतीच्या आत म्हणजेच दिनांक ०४.०९.२०१२ रोजी सदरचा दावा दाखल झालेला आहे. वादीच्या तोंडी अथवा लेखी साक्षीला संशयास्पद ठरवेल, अशी कोणतीही बाब संपुर्ण प्रकरणात नोंदविली गेली नाही. प्रतिवादीने दाव्यात दाखल होण्याचे कष्ट न घेतल्याने वादीचे कथन व पुरावा अबाधित राहतो. अशा परिस्थितीत वादी हा प्रतिवादीकडून येणे असलेली रक्कम रु. ४१,००,०००/— व नोटीस खर्च रक्कम रु. २,०००/— वसुल करण्यास हक्कदार राहतो. जिथपर्यत व्याजाच्या रकमेचा प्रश्न बाकी आहे, तिथे, वादी व प्रतिवादीतील व्यावहारीक संबंध पाहता, वादी दावा दाखल तारखेपासून ९ टक्के द.सा.द.शे. व्याजदर मिळण्यास हक्कदार राहतो. करिता, मी मुद्दा क. १ चे उत्तर त्यानुरुप नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

१. दावा खर्चासह मंजूर करणेत आला.

२. प्रतिवादीला असा निर्देश देणेत येतो की, त्याने वादीला रक्कम रु. ४१,०२,०००/—, ९ टक्के द. सा. द. शे. व्याजदराने, दावा दाखल तारखेपासून ते संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यत द्यावेत.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा काढणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित केला.)

(प्र. र. अष्टुरकर)
दिनांक : ०२.०१.२०१७. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पुणे.

I affirms that, the contents of the P. D. F. file Judgment are same word for as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Sou. C. N. Jagtap |
| Court Name | : | P. R.Ashturkar<br>Jt. Civil Judge, S. D. Pune. |
| Date | : | 02.01.2017 |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 06.01.2017 |
| Judgment uploaded on | : | 06.01.2017. |